महाराष्ट्र शासन
जिल्हा समादेशक, होमगार्ड, रायगड
मु.पो.गोंधळपाडा, ता.अलिबाग, जिल्हा रायगड.
ईमेल – dchg.raigad@yahoo.com

जावक क्र. :- जिस/प्रशि/होगा/ 262 /2024 दिनांक :- 20/08/2024

## रायगड जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी – 2024

## सदस्य नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक

जिल्हा होमगार्ड रायगड नवीन होमगार्ड सदस्य नोंदणीकरीता रायगड जिल्ह्यातील ज्या रहिवासी उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे त्यांच्या करीता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सदर नोंदणी फक्त रायगड जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांकरीता असून इतर जिल्ह्यातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहू नये. तसेच रहिवासी भागातील पथक/उपपथक सोडून इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरतील.

अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी, शारिरिक पात्रता व क्षमता चाचणी याकरीता दि.29/08/2024 ते 01/09/2024 या कालावधीमध्ये सकाळी 06:00 वाजता खालील प्रमाणे जिल्हा क्रिडा संकुल, नेहुली येथे उपस्थित राहतील. उमेदवारांना सकाळी 06:00 ते सकाळी 10:30 या कालावधीमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्र. | दिनांक | बोलविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्रमांक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 29/08/2024 | अर्ज क्र.0003 ते 4090 मधील फक्त महिला उमेदवार | 890 |
| 2 | 30/08/2024 | अर्ज क्र.0001 ते 1230 मधील फक्त पुरुष उमेदवार | 1000 |
| 3 | 31/08/2024 | अर्ज क्र.1231 ते 2484 मधील फक्त पुरुष उमेदवार | 1000 |
| 4 | 01/09/2024 | अर्ज क्र.2485 ते 4095 मधील फक्त पुरुष उमेदवार | 1208 |

सूचना :-

1) कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अर्जासह आवश्यक कागपत्रांच्या छायांकित प्रती उमेदवारांनी स्वतः स्वाक्षरी करुन जोडाव्या. दोन फोटो व मूळ कागदपत्रे नोंदणी वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील. उमेदवारांना नोंदणकरीता स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

2) उमेदवारांना शरिरिक क्षमता चाचणीमध्ये पात्र होण्याकरीता प्रत्येक प्रकारामध्ये 40 टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील. (धावणे या प्रकारात 10 गुण व गोळाफेक या प्रकारात किमान 4 गुण आवश्यक) धावणे चाचणी या प्रकारामण्ये अपात्र ठरल्यास गोळाफेक चाचणी धेतली जाणार नाही मात्र धावणे चाचणी मधील अपात्र अमेदवारांना त्यांच्या डिटेल सोबत शेवटपर्यंत थांबावे लागेल व चेस्ट क्रमांक जमा करावे लागेल मध्येच पळून जाणाऱ्या उमेदवारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

3) उमेदवारांनी किमती वस्तू, मोबाईल, स्मार्ट वॉच, इ. सोबत आणू नयेत आणल्यास स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळाव्यात याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर राहणार नाही.

सदर नोंदणी प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडण्यात येणार असून नवीन होमगार्ड सदस्य नोंदणीकरीता उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये तसेच शिफारस/वशिला इ. गैरमार्गाचा वापर करू नये. होमगार्ड सदस्य नोंदणीकरीता कोणी पैसे/लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा.अपर पोलीस अधीक्षक, रायगड किंवा अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रायगड यांच्याकडे तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सुचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल त्यामुळे उमेदवारानी सदर संकेतस्थळावरील सुचनांकरीता अद्यावत रहावे.

( सोमनाथ घार्गे )
पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग.

Scanned with OKEN Scanner